# गजा

साईनाथ चन्ने



या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण व नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठीलेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे . तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

प्रकाशक -:ई साहित्य प्रतिष्ठान

संपर्क - अनघा हिरे ( ९४२२२८४११६)

www. esahity. com

esahity@gmail. com

प्रकाशन १४ एप्रिल २०१७ (भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती)

विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध

आपले वाचून झाल्यावर आपण फॉरवर्ड करू शकता

हे पुस्तक वेबसाईट वर ठेवण्यापूर्वी किंवा वाचनाव्यातिरिक्त कोणताही वापर करण्यापूर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी आवश्यक आहे.

पुस्तकाचे नाव. . . . . गजा

लेखक

श्री. साईनाथ चन्ने (M. A. B. Ed)

प्रा. शिक्षक जि. प. शाळा सहस्रलिंग

ता. रावेर जि. जळगाव

मो. नं. ९४२०३०१३०९

पत्ता

साईनाथ चन्ने

मु. पो. सवंदगाव

ता. वैजापुर जि. औरंगाबाद

९४२०३०१३०९

मेल. . . sainathchanne@gmail. com

या कथेतील सर्व पात्र, घटना, प्रसंग, स्थळे हे काल्पनिक असून त्यांचा इतर कुणाशीही कवडीमात्र संबध नाही. . .

लेखक उवाच. . . . .




वाचक मित्रहो,

शिक्षक या नात्याने सर्व गोरगरीब मुलं शिकावी, ज्ञानाच्या प्रकाशात यावी या हेतुने दिनांक ३१जुलै २०१५ रोजी केलेल्या शालाबाह्य मुलांच्या सर्व्हेक्षणात मंजु नावाची एक शालाबाह्य मुलगी आढळली. . . त्या मुलीला शाळेत आणतानाच मला ही कथा सुचलेली अन आज मी तिला कागदावर उतरवली. . आज मंजु दुसरीला आहे. तल्लख बुद्धिमान, अन मोत्यासारखं गोल अक्षर असलेली बारकीशी मंजु छानपणे संगणकावरील गाणी गोष्टी पटापट लिहीते, वाचते तेव्हा माझ्यातला शिक्षक मनोमन हर्षीत होतो. मित्रहो आज माझ्या शालेय परिसरात एकही मुल शालाबाह्य नाही याचा मला अभिमान आहे

या पुस्तक पुष्पातून वाचकांना एकच विनंती. . . .

आपल्या आजुबाजुला कुणी शालाबाह्य बालक दिलल्यास त्याला जवळच्या जिल्हा परिषद शाळेत जरूर दाखल करा, आंतरीक व आत्मिक समाधान मिळाल्याचा अनुभव येईल.

मित्रहो मी लेखक तर मुळीच नाही, मी फक्त निरीक्षण करून जाणवलेल्या प्रसंगाना मुर्तरूप देणारा एक कल्पक आहे. तरीही माझ्या ‘ब नि बा’ व ‘शावड्या’ या दोन्ही पूस्तकांना भरपुर दाद दिल्याबद्दल मनस्वी धन्यवाद. . .

माझे हे ही लेखन आपणास नक्कीच आवडेल ही आशा. . . .

धन्यवाद.

अर्पण पत्रिका. . .

शिक्षणासारख्या पवित्र कार्यात मला घेवून येणाऱ्या

व मला शिक्षक  बनवण्यासाठी अहोरात्र मेहनत करणाऱ्या

माझ्या दोन्ही बंधुना

हे माझं तिसरं पुस्तक पुष्प

सप्रेम भेट..

---साईनाथ  चन्ने

अनुक्रमणिका. . .

१)  गजा

२) ट्रकमारी

३) हडळ

४) मंजुची शाळा

## १) गजा

आभाळ भरून आलेलं, पावसाळ्याचे दिवस, आकाशात काळ्या ढगांनी गर्दी केलेली, मधेच ढगांचं अन विजेचं कडकडून भांडण व्हायचं अन लख्ख उजेड दाटायचा.

यापुर्वी एक दोन पाऊस कोसळलेले, सातपुड्याच्या कुशीतून नदी नाले ओढे नुकतेच अवतरलेले, डोंगरानं नुकतीच गवताची हिरवी कालीन बिछवलेली, झाडं वेलीनी नुकतीच हिरवी साडी नेसलेली. .

मंगळवारचा बाजाराचा दिवस, सांज ढळत होती, बाजार उठत होता, पालावाले पाल सोडत होते, भाज्यांवाले भाजी सस्तात देवून घर जवळ करू पाहत होते. .

गजालाही घाई झाली होती, दिवसभर जंगलात हिंडून फॉरेस्टवाल्यांना चुकवून त्यानं कशीबशी लाकडाची मोळी विकली होती, पटापटा भाज्या अन तेल, मीठ, साखर पत्ती घेत तो निघला होता. . . . .

गजा भिल ईथंच दोन मैल लांब डोंगरावर त्याचं खोपटं होतं, सरळ सरळ काड्यांचं कुडाचं अन गवताच्या छपराचं, पावसाळ्यात गळू नये म्हणुन मधून एक कचकडा (प्लास्टीक कागद) बांधला होता. .

या खोपटात गावापासून दुर तिघेच राहायचे , गजा, रख्मी, अन दोन तीन वर्षाची पोर मंजी. .

गजा आज आनंदात होता, कारण आज त्याला फॉरेस्ट ऑफिसर नागपुरकर साहेबांचा निरोप मिळाला होता. गावाच्या मागंच डोंगरावर झाडं लावायला गड्डे खणायचं काम सुरू झालं होतं. दोन कोटी रोपं लावायचे होते. चांगलं दोन महीने काम चालणार होतं. . .

या तंद्रीतच वीज कडकडली अन गजा भाणावला. खोपट्यात रख्मी अन मंजी एकट्याच होत्या, तो गडबडीनं निघाला. आडदांड गडी भरल्या शरीराचा, पहिलवानी वळणाचा, सहा साडे सहा फुट उंच काळाकभिन्न, गठल्या शरीराचा, गजा पायाखालची वाट दाबीत निघला होता. . .

गजानं कंबरेची शाल आवळली, डोक्याला मुंडास पक्क बांधल, हो त्याचा पेहरावच तसा, कमरेला स्वागताला वापरायच्या शालीची लुंगी , अंगात नेहरू सदरा अन डोक्याला लांब उपरण्याचं मुंडास, हातात मोठं चांदीच कडं व पायात चामडी पट्टेरी चप्पल . . . . . .

मुंडाशा खाली घमेल्याएवढं डोकं  अन काळाकभिन्न चेहरा , मोठे गरगरीत डोळे अन टपोरं नाक, नाकाखाली लांब बहादुरी पिळलेल्या राजेशाही मिशा. . .

जंगली जनवरांना पळवण्यासाठी हातात सहा फुटी बेताची काठी, दोन्ही बाजुला घुंगरु लावलेले, सरपटणार्या प्राण्यांपासून बचावासाठी. . . .

हातात पिशी सावरून, काठी जमिनीला आपटीत घुंगराच्या तालात तो धापा टाकत चालला होता. लवकर पोचावं म्हणून डांबरी रस्त्याऐवजी  सरळ डोंगरच चढला होता. अंधार वाढला होता अजून डोंगर उतरणं बाकी होतं, समोर डोंगरपाळीला त्याची काड्यापेटी एवढी झोपडी अंधुकशी दिसत होती. . . . . . .

गजानं उसासा घेतला पिशवी हातात कचकटून दाबली अन काठीवर भार देत धाव घेतली, आता त्याला धावतच डोंगर उतरायचा होता, काठीवर तोल धरीत अन झाडांपासून स्वतःला वाचवीत गजा अर्ध्या तासात डोंगर उतरला, दीड तासाचं अंतर अर्ध्या तासात कापून त्यानं खोपट्यापुढं खाटावर टेकत रख्मीला आवाज दिला.

रख्मे ए रख्मे वाईच पाणी तरी पाज.

रख्मी चमकली, धन्याला पाहून आनंदली पाण्याचं भांड हातात देत म्हणली.

लयच वखुद केलासा.

हा जरा येळच झाला

आगं सायब भेटल्यात काम निगलं पहाडात, चांगलं दोन महीनं पुरीन.

व्हय का, देवच पावला रं बाबा.

हात पाय ध्वा म्या पानं वाढते.

रख्मे काय रांधलासा , काय नवतं ना घरात?

आवं मुर्ग्यानं आंडे दिल्यात तेंच कालवण अन मक्कीची रोटी रांधल्यान. . .

तसे तीघे जेवले अन अंधारात झोपेत गडप झाले. . . . .

पहाटी कोंबड्यांनी कालवा केला अन रख्मी उठली. काल आणलेल्या बाजारातून सगळे वांगे कापले अन झणझणीत काळं कालवण व मक्कीच्या रोट्या बडवत गजाला आवाज दिला. . .

तसा गजा आळापिळा देत उठला, शाल घेतली बाहेर जावून आला अन तसाच येता येता नदीतून अंघोळ करून आला.

तीघांनी न्याहारी केली, दुपारी बांधली. गजानं मंजीला खांद्यावर घेतली व फावडं उचललं. रख्मीनं घागर अन भाकरीचं पेंडकं घेतलं.

रख्मी अन गजा आनंदात डोंगरांच पोट फाडत होते , पगार अन गहू बक्कळ मिळत होते. गजानं बाजारातून सगळ्यांना नवी कापडं आणली होती. आजपासून काम संपलं होतं म्हणून तो थोडा नाराजपण होता.

रख्मीनं गजाची घालमेल हेरली, त्याचा शीण घालावा म्हणून तीनं स्वच्छ अंग धूतलं, नवं लुगडं ल्याली अन गजाला जेवण वाढलं, गजा हरकून गेला. रख्मीचं लक्ष्मीरूप अन हळूच चोरून पाहणं त्याला सर्व चिंताचा विसर पाडीत होतं. . . . .

आकाश निरभ्र होतं, चांदण्या लूकलुकत होत्या, अन गजा खोपटासमोर गोधडीवर डोळे लावून विचारात गढला होता. . . . .

रख्मी काम आटपून हळूच त्याच्या जवळ कलंडली नकळतच तीचा हात गजाच्या छातीवर आला अन ती गजाच्या भारदस्त बाहूत विरघळली. . . . . . . . . . .

आजच्या चांदण्या रातीचं चांदणं हळुवारपणे तीच्या गर्भात चमकलं होतं. . . . . ,

## २) ट्रकमारी

पहाट झाली रख्मी उठली तीला स्वतःला तीचं शरीर कापसासारखी हलकं वाटत होतं ती नदीवर गेली अन नदीचं पाणी अंगावर शहारा आणून जात होतं. .

रख्मीला समजलं होतं तीनं खात्री करण्यासाठी पावर्याच्या रंभाईला सांगितलं, रंभीनं पोटावरून हात फिरून कसला तरी पाला चावायला दिला . . .

काय रख्मे कसा लागतो पाला?

ग्वाड हे रंभाई.

पावला रं देवा रख्मीला, आगं रख्मे पोटुशी हाय कायजी घे वं माय.

व्हय रंभाई .

पंख फुटल्यावानी रख्मी खोपट्याकडं आली अन लाकडं फोडणार्या गजाला म्हणली. . . .

आवं रंभाई म्हणली. . . . . रंभाई म्हणली. . . .

काय म्हणली रंभाई?

रंभाई म्हणली का म्या पुन्यांदा गर्भार हाय. . . . .

काय? गजाचा आनंद गगनात मावंना, हातातली कुर्हाड टाकून त्यानं तीला उचलून गरगरा फिरवली.

रख्मी लाजून खोपट्यात गेली.

तव्हा पासून तो रख्मीची लय काळजी घेवू लागला. . . . . .

पण आनंद जास्त दिवस टिकला नाही, काम संपलं होतं, आता पुन्हा जंगल वाल्यांना चुकवून रात्री लाकडं तोडावी लागणार होती. .

अंधार घट्ट झाला होता, गजानं कुर्हाड उचलली, दोर अन काठी घेतली व रख्मीला खोपट्याचं दार लाव म्हणला. . . . .

गजा अंधारात गडप झाला. तो विचारात चाल्ला होता, तोच त्याला रस्त्याच्या कडंच्या झाडात कुजबूज ऐकु आली, तो गरजला.

कोण हाय रं तडी ?

आमान हावं रं गजाबा. . .

कुजबुजणार्या गावातल्या उनाड पोरांनी त्याचा मर्दानी आवाज हेरला होता. . . . .

गजा जवळ गेला अन म्हणला.

काय रं काय बात हान ?

गजाबा कामं संपल्याती घरात चुल पेटीना बग.

पोरांनी खरी हकीकत सांगितली.

मंग काय बैतनाला (लाकडं) आले  व्हय ?

नाय रं गजाबा तो जंगलवाला सायब लय खराब हे म्हणत्यात, डायरेक्ट जेलात टाकतो म्हणं. .

मंग अडी का बरांन बसलान रं ?

गजाबा टरकीतलं सामन काढू म्हणतोय.

आरं पण ही चोरी चांगली नाय गड्यानू

हाव रं गजाबा पण चूल तर पेटली पायजेल का नाय ?

तसा गजा विचारात गढला , थोडं थांबून रख्मीचा आनंद आठवून म्हणला. . . . .

म्या पण येवु काय रं संगतीला ?

गजा सारखा सिंह टोळीला भेटल्यावर नाही कोण म्हणतो.

पोरांनी गजाला हातमोजे , एक हमाली आकडा अन रेजर पान दिलं, गजा सज्ज झाला.

सगळे खराब रस्त्याजवळ झाडीत दबा धरुन बसले.

तेव्हा जळगावची केळी मध्यप्रदेशात जायची अन तिकडचं सामान घेवून ट्रका ये जा करत राहायच्या. . . . .

अचानक लाईट चमकले अन दुरून येणारी एकटी ट्रक दिसली. . . . केळीच्या वजनाने व चढणीच्या रस्त्याने हळुहळु रांगत चढण चढत होती. . .

तसा गजा कुदला, दोर धरून सरकन वर गेला , दाताातल्या रेझरनं टरकन फट्टा चिरला, अन केळीच्या घडाचा दांडा धरून ताकतीनं फेकला खाली.

खाली पोरं तयारच होते , तो घड फेकायचा अन बाकी उचलून झाडीत लपायचे .

गजानं चौदा पंधरा घड फेकले अन उडी मारली, तोवर गाडी चांगल्या रस्त्यावर आली अन गिअर लावून निघून गेली. .

ईकडं सगळ्या जणांनी दोन दोन घड घेतले, गजा ताकतवान त्याला तीन दिले, रात्रीच सगळ्यानी ढाब्यावाल्या केळीचे चिप्स बनवणार्यांना ते विकले , त्यांनाही स्वस्त मिळाल्याने त्यांनी पन घेतले. . .

गजाला एक तासात दीडशे रुपये मिळाल्यानं तो जाम खूष होता. . . . रख्मीला न सांगता त्याचं हे काम जोमात सुरू होतं दररोज नेमानं. . . .

ट्रकवाल्यांनाबी याची भणक लागली होती, ते सुद्धा तयारीत असायचे. .

आज गावात जत्रा होती , तमाशा होता म्हणून पोरं आली नव्हती, आज गजा एकटाच होता मिशनवर. . . . . . .

ईतक्यात चढणीवर चढणारे लाईट दिसले अन दुरून वार्याबरोबर पिकलेल्या सफरचंदाचा वास घमघमला. . . .

गजा सज्ज झाला, तो उडी मारून चढला हे किलनरनं पाहीलं होतं.

सतनाम श्री वाहेगुरू लिहीलेली पंजाबी जाटाची ट्रक, अन तीशीतला दाढीवाला पंजाबी किलनर, वाहेगुरूजी का खालसा वाहेगुरूजी की फतेह म्हणत रस्सीला धरुन मागं आला.

गजा आपल्या कामात मग्न होता. . त्यानं एक कॅरेट फेकलं अन दुसर्याची तयारी सुरू होती. . . . .

खाली रस्सीला लटकलेला जाट मात्र रागानं लाल झाला होता. कमरेचं क्रूपाण काढून त्याने गजाच्या पायावर सपासप वार केले अन गजा कळवळला, उडी टाकून उतरला अन पंजाबी जाट शिव्या हासडत निघून गेला. . . . .

गजानं दुखत्या पायानं कॅरेटमधे सफरचंद भरले अन लंगडत कुलपत घर गाठलं.

कसलासा पाला कुटून पायाला बांधला अन खाटावर कलंडला.

सकाळी सफरचंद बघून मंजीनं गडबड केली . सारा प्रकार रख्मीला सांगून हे काम सोडलं असं म्हणला. . . . .

अंगात रग होती म्हणून जखम भरली पण धोंडशीर तुटल्यानं तो आधु झाला होता.

आता पहिल्यासारखं धावता पळता अन झाडावर चढता येईना त्याला. . . .

धडधाकट सिंहासारखा गजा आता लंगड्या घोड्यासारखा झाला होता. . . . .

## ३) हडळ

आज वातावरण सुन्न होतं. सुर्य आग ओकत होता. डींक काढण्यासाठी गजा अन रख्मी मान ताणून धावर्यांची फांदी ना फांदी तपाशित होते. . . .

गजा जरा लांबच गेला होता. रख्मी मात्र भरल्या पोटानं सावध पाय टाकत हातातल्या बांबून डींकाचा गोळा पाडायची. मंजी ते वेचून पिशीत टाकायची. .

दुपारचा सुर्य आग उगळीत होता. वर बघून बघून रख्मीला चक्कर येत होते पण ती तशीच रेटत होती. मंजी शेजारीच चिंचीच्या झाडाखाली चिंचा गोळा करीत होती.

अचानक रख्मीला सारं जंगल हालु लागलं. तिला भोवळ आली अन हातातला बांबू निसटून झाडावर अटकला. रख्मी कोसळली. डोंगराच्या उतारावर चेंडु सारखी गडगडली. काट्याकुट्यानं अंग लडबडलं. गडगडत रख्मी समोरच्या मोठ्या अंजनाच्या झाडाला जाऊन धडकली. . .

रख्मीची शुद्ध हरपली होती.

फाटक्या पोलक्यात ओजंळभर चिंचा झाल्यावर मंजी आईला शोधु लागली, पण ती कुठंच दिसंना.

मंजी रडता रडता  आवाज देवु लागली.

ब वं ब ओ माय.

पण काहीच उत्तर नव्हतं.

मग मंजीनं चिंचा फेकल्या अन गजाकडं पळाली.

बा व बा. . . . ती ब नाय सापडत.

तसा गजा आला, ईकडं तिकडं शोधाशोध करून आवाज दिला. .

रख्मे वं रख्मे. .

गजाची नजर अचानक समोर अंजनाखाली पडलेल्या रख्मीवर गेली.

गजा मटकन खालीच बसला, स्वतःला कसाबसा सावरत रख्मी जवळ आला.

रख्मे व रख्मे काय व्हया वं. ?

रख्मी बेशुद्ध होती. मंजी रडत होती. गजानं मंजीजवळच्या पोतं लावलेल्या बाटलीतलं गार पाणी रख्मीच्या तोंडावर मारलं . . .

रख्मीला जाग आली. वेदनांनी विव्हळत ती रडु लागली.

गजा तिला समजावित म्हणला. चाल घरांकन जावू.

डींकाचं वझं मंजीच्या हातात देत त्यांना रख्मीला उचलून घ्यायचा प्रयत्न केला अन तो थबकलाच, रख्मीचं लुगडं रक्तानं चिंब भिजलं होतं, फुगलेलं पोट पार वसरलं होतं, सहा सात महिन्याचं इवल्या हातपायाचं लेकरु नाळाला लटकत होतं. . . .

गजानं तिला खाली ठेवलं . दगडानं मेल्या लेकराचा नाळ ठेचला त्याला तिथंच माती दिली. .

रडणार्या अन रक्ताळलेल्या रख्मीला घरी आणली. .

रख्मीचं मात्र वागणं पुरतं बदललं होतं. ती पुर्ण शांत झाली होती. तिला कामाचा अन मंजी व गजाचाही विसर पडला होता. नुसती भुतासारखी बसून राहायची ती, मधेच हसायची, मधेच रडायची, रात्री बेरात्री उठून चालायची.

एकदा दोनदा तर चक्क रात्री गावात गेली. लोक तिला घाबरू लागले. बायाबापड्या तर तिला हडळ म्हणू लागल्या, तिला शिव्या घालू लागल्या, ती दिसली की मुला बाळांना लपवून ठेवु लागल्या.

गजा मात्र लाकडं विकायला जायचा अन मंजी रख्मीची काळजी घ्यायची.

एकदा तर कहरच झाला, दामु पाटलाचा नातु नदीत पोहत होता अन रख्मी घागर भरायला गेली. एकाएकी ते पोर तापान वारलं. पाण्यात भिजल्यानं फणफणलं होतं ते. सार्या गावानं त्याचा दोष रख्मीवर मढला.

ही हडळ आपल्या गावात नगं.

लेकरायला खाती ही, हीला गावाबाहेर काढा.

तशी रख्मी भानावर आली, गजाला रडून सांगु लागली.

म्या हडळ नाय, , , , , , म्या हडळ नाय.

तसा तीला जवळ घेत गजा म्हणला.

ठावं हाय मला , तु हडळ नाय , पण ईठलं देव कोपल्यानं आपल्या वर .

दोघांनी रात्री सामानाचे गठुडे बांधले , कोंबड्याचं डालं उचललं अन पहाटीच निघले नव्या गावासाठी.

झोपडं मात्र तसंच त्यांच्या सुखी संसाराची साक्ष देत उभं होतं

४) मंजीची शाळा. . . .

गजा नि रख्मी सकाळ पासून चालत होते. मंजी थकली होती. ती रख्मीला म्हणली, ब मले भूक अन तहान बी लागल्यान. . .

रख्मी गजाला थांबीत म्हणली. . .

आवं जरा बसा झाडाखाले, पाणी गिणी पेवू , पोरला दोन कोर घालू , मान बी मोडाया आली.

गजानं गठुडे उतरवले. रख्मीनं शेजारच्या झर्यातून घागर भरून आणली. गडगडा पाणी पिले. रख्मीनं मंजीला रातची कडकधोड मक्कीची भाकर अन लाल ठेचा दिला.

भूकेपायी ती आघाशासारखं चावत, हुसहुसत घशाखाली ढकलत होती.

अचानक गाडीच्या आवाजानं गजा भाणावला कुणीतरी आवाज देत होतं. . . .

गजा ए गजाबा. . . . नागपुरकर साहेब फारेस्टावाले

काय मालक ?

आरे कुठे निघलास ?

नशीब नेईन तिकडं सायब. .

आरे ईथं शाळेजवळ आर्धा किलोमीटर  एक चेकपोस्ट बनवलीय, राहतोस का गाड्या थांबवायला, चांगलं पाच वर्ष काम आहे. . . .

व्हय व्हय सायब राहतु की. . . .

मग तीथं आपल्या जंगलाच्या जागीत बांध तुझं झोपडं. . .

आरे गजाबा हे घे ओळखपत्र, आज पासून तो जंगलाचा कंत्राटी कामगार. . .

नाव सांग तुझं पुर्ण. . . .

गजा राम्या भिल. . .

हे घे . . . पण गजा साहेबांनी पावती दिल्याबगैर वाहन जाउ द्यायचं नाही. . . .

व्हय सायब. . . .

गजानं काड्याची खोपट बांधली अन कामावर हजर झाला . . .

गजाच्या ईमानदारीमुळे साहेब खूष असे. . .

गजाची चिंता मिटली होती . तीन हजार पगार मिळत त्याला. . . . .

आज गजाची रातपाळी होती. . दिवसभर मोकळाच होता तो म्हणून मंजी सोबत खाटावर खेळत बसला होता. . .

अचानक सरपंच नि हातात पॅड घेतलेलं कुणीतरी खोपटाकडं येताना दिसलं. . तसा गजा खाट झटकीत म्हणला. . . .

या या मालक कसं काय याणं गरीबाकडं

आरं गजाबा तुह्याकडंच आलतो सरपंच म्हणले.

का ? काय आगळीक झाली का मालक ?

नाही रे गजा. . .

हे आपल्या शाळेचे गुरूजी. .

नमस्कार गजाबा मी साईनाथ चन्ने गावातल्या जिल्हा परिषद शाळेत शिकवतो. .

व्हय व्हय रामराम रामराम. . . . . काय काम हे का साळंत आत्ता करतो मजूरी पन नगं पोरं शिकत्यात पुण्याईचं काम हाय. .

नाही नाही काम बीम काही नाही रे गजाबा, तुझ्या मुलीला शाळेत न्यायला आलो होतो आम्ही, तु आता पाच वर्ष राहणार ना ईथं. . . .

व्हय मालक पण माही मंजी, गरीबाची पोर अन साळंला . . . . . . . . . . . . .

अरे गजाबा ती शाळेत जावी, शिकावी असं नाही का वाटत तुला. .

पन मालक तीला कापडं, बुकं हे कसं जमणार माह्या गरीबाकडून. . . . .

अन हे सगळं मी दिलं मग तर पाठवशीन की नाही. . . .

आरे गजाबा हे सगळं भेटतं आमच्या शाळेत, अन हो दुपारचं जेवणसुद्धा भेटतं. . .

अन गड्या मंजी दररोज शाळेत आली तर पैसे पन भेटतील मग तर बस की नाही. .

पन गुरूजी माही गरीबाची पोर. . . .

आरे गरीब बिरीब काही नाही. . . सगळी पोरं सारखीच असतात आम्हाला. . . . .

चाल बोलव तीला लवकर. .

गजा नं मंजीला आवाज दिला. . . . मंजे ए मंजे. . . .

मंजी घाबरत घाबरत आली. . . . . .

साहेब हे माह्य लेकरु . . . . . . मंजी

मंजी. . . बरं का गजाबा आजपासून हीचं नाव मंजु . . . . . . मंजु म्हणायचं तीला. . . .

बाळ तुझं नाव काय ?

मंजी. .

मंजी नाही . . . . . मंजु गजा भिल. . .

आईचं नाव सांग तुझ्या ?

रख्मी . . . . .

रख्मी नाही . . . . . रख्माबाई म्हणायचं . . . . .

चाल गजाबा अंगठा टेकव अन मंजुला शाळेत पोचवून ये. . . . .

लय उपकार मालक. . .

आरे गजाबा. . . . पन मंजु दररोज शाळेत आली पाहीजे बरं का. . .

व्हय व्हय . . . .

(मंजु आता दररोज टापटीप शाळेला येते. धडाधड वाचते, अक्षर तर मोत्यावाणी गोल काढते.

गजा अन रख्मी तर तीच्याकडं पाहतच राहतात. . . . .

मी मात्र  मंजुचा शिक्षक असल्याचा अभिमान बाळगतो. . . . . )

# ई साहित्य प्रतिष्ठान

आता मराठी ई पुस्तकं तुम्ही www. esahity. com वरून डाऊनलोड करा.

किंवाesahity@gmail. com ला कळवून मेलने मिळवा. किंवा7710980841हा नंबर सेव्ह करून या नंबरला तुमचे नांव व गांवWhatsapp करून पुस्तके whatsapp मार्गे मिळवा.

किंवा ई साहित्यचे app. https://play. google. com/store/apps/details?id=com. esahity. www. esahitybooks या लिंकवर उपलब्ध आहे. तेdownload करा.

हे सर्व मोफ़त आहे.

आता ठरवलंय. मराठी पुस्तकांनी अवघं विश्व व्यापून टाकू. प्रत्येक मराठी सुशिक्षिताच्या मोबाईल मध्ये किमान पन्नास मराठी पुस्तकं असलीच पाहिजेत. प्रत्येक मराठी माणसाच्या!

तुमची साथ असेल तर सहज शक्य आहे हे… कृपया जास्तीत जास्त लोकांना यात सामिल करून घ्या.

आपले नम्र

टीम ई साहित्य

ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com